# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३
दूरध्वनी क्रमांक:२४३०६७१७/२४२२७७५८/४३२२६८००


जा. क्र.: मका/कार्यक्रम/२०१५-२०१६/९२६८ दिनांक : २९-८-२०१५

## परिपत्रक

**विषय:- कामगार व कामगार कुटुंबियांच्या दूर पल्ल्याच्या सहली.**

मंडळाचे सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम -१९५३ च्या कक्षेत येणाऱ्या व मंडळाकडे कामगार कल्याण निधी भरणाऱ्या कामगार, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांकरीता औद्योगिक, भौगोलीक किंवा ऐतिहासीक प्रेक्षनिय स्थळे पाहण्याकरीता दूर पल्ल्याच्या सहली आयोजीत करण्याची मंडळाची योजना आहे.

सहलीच्या नियम व अटी पुढीलप्रमाणे आहेत.

नियम व अटी :-

१) सहलीमध्ये भाग घेणाऱ्या सभासदाचे वय कमीत कमी १८ वर्षे असणे आवश्यक आहे.

२) सहलीमध्ये भाग घेणारा सभासद हा कामगार कल्याण केंद्राचा सहा महिन्यापूर्वीचा सभासद झालेला असावा.

३) सहलीमध्ये एका कुटुंबातील जास्तीत जास्त दोन सभासदांना सहाभागी करण्यात येईल.

४) सहलीमध्ये भाग घेणाऱ्या सभासदांनी सहलीमध्ये स्वत:च्या जबाबदारीवर भाग घेत असल्याचे प्रतिज्ञापत्र लिहुन देणे आवश्यक आहे.

५) सहलीमध्ये कमीत कमी २५ व जास्तीत जास्त ४० सभासदांना प्रवेश दिला जाईल.

६) सहलीमध्ये एका पेक्षा जास्त आस्थापनांच्या कामगार कर्मचारी व कुटुंबियांचा सामावेश असणे आवश्यक आहे.

७) सहलीमध्ये भाग घेणाऱ्या सभासदांना सहलीच्या ठिकाणापर्यंत परतीसह प्रवासखर्चाची रक्कम रु. २००/- आणि दैनिक भत्ता व किरकोळ खर्चासाठी प्रत्येकी रु. १२०/- मंजूरी देण्यात येईल.

८) सहल दर वर्षी माहे डिसेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत आयोजित करण्यात येईल.

सहल आयोजीत करण्यासाठी संबंधीत केंद्र प्रमुखांनी वरील नियम व अटी प्रमाणे प्रस्ताव तयार करुन प्रस्तावामध्ये सहलीची तारीख, सहलीचे ठिकाण, सभासदांचे संपूर्ण नाव,आस्थापनेचे नाव, कामगार कुटुंबिय सभासद असल्यास रेशन कार्ड इ. खात्री करुन सभासदांच्या यादीसह संबधित कामगार कल्याण अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर करावा. कामगार कल्याण अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे आलेल्या प्रस्तावाची तपासणी करुन प्रस्ताव मंजूरीसाठी संबंधीत विभाग प्रमुखांकडे सादर करावा. विभाग प्रमुखांना मंडळाच्या नियम व अटीप्रमाणे त्यांच्या स्तरावर प्रस्तावास मंजूरी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सहलीसोबत सहल प्रमुख म्हणुन संबंधीत केंद्राच्या केंद्र प्रमुखास जाण्यास मान्यता व मंजूरी देण्यात येत आहे. त्यांना मंडळाच्या नियमाप्रमाणे कमीत कमी दराचा प्रवास खर्च व दैनिक भत्ता मंजूर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सन २०१५-१६ या आर्थीक वर्षापासुन प्रत्येक केंद्राच्या केंद्रप्रमुखांनी सहलीचे आयोजन करणे बंधनकारक आहे. जे केंद्र प्रमुख सहलीचे आयोजन करणार नाहीत त्यांचेवर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरचे परिपत्रक २०१५-१६ या चालु आर्थीक वर्षापासुन पुढील आदेश निघेपर्यंत अमलात राहील.

कल्याण आयुक्त

प्रत,

१) लेखा व लेखा परिक्षा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
२) लेखा अधिकारी / लेखा परिक्षा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
३) सहायक कल्याण आयुक्त, कार्यक्रम/भांडार/संगणक/निधी मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
४) प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई
५) सहायक कल्याण आयुक्त,विभागिय कार्यालय,ठाणे/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे/ अकोला कामगार क्रीडा भवन, मुंबई
६) प्रभारी सहायक कल्याण आयुक्त,विभागिय कार्यालय, औरंगाबाद
७) सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागिय कार्यालये.
८) कामगार विकास अधिकारी, का.क.भवन नागपूर/पुणे.
९) कामगार कल्याण अधिकारी (१८ गट कार्यालये).★★★
१०) सर्व केंद्र प्रमुख

★★★ सदरचे परिपत्रक केंद्र प्रमुखांना उपलब्ध करुन द्यावे.